# प्रकरण - दुसरे

---

# दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे ऊस आंदोलन (२००७)

## प्रकरण – दुसरे

## ''दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे ऊस आंदोलन ( २००७ )''

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेती हा राष्ट्रीय उत्पन्नाचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा २२% आहे. एकूण श्रमिकांपैकी ६०% श्रमिकांना शेतीक्षेत्रात रोजगाराची प्राप्ती झाली आहे. शेतकरी हा आपल्या एकूण उत्पन्नातील $^{२}/_{३}$ भाग शेतीविषयक वस्तूंवर खर्च करीत असतो. कृषी प्रक्रिया उद्योगासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा शेती क्षेत्रातून केला जातो. निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूत कृषी वस्तूंचे प्रमाण अधिक असते. अशा या शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेत शेतीमालाच्या किंमतींना अत्यंत महत्त्व प्राप्त होते.[१] तरीपण शेतीमालाला पाहिजे त्या प्रमाणात दर मिळत नाही. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये कर्जबाजारीपणा निर्माण झालेला दिसतो. भारतीय स्वातंत्र्याच्या ६१ वर्षानंतरही आज भारतामध्ये दारिद्र्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. आणि हा दारिद्र्य हटविण्याचा प्रश्न आजच्या राज्यकर्त्यांच्या आर्थिक धोरणाचा केंद्रबिंदू नाही. अगदी आर्थिक, औद्योगिक विकासाच्या बाबतीत आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्रासारख्या राज्यातील आजची परिस्थिती लक्षात घेतली तरी हे सहज स्पष्ट होते. 'भारतीय नियोजन मंडळाच्या आकडेवारीनुसार भारतातील एकूण दारिद्र्याचे प्रमाण १९८३ मध्ये ४४.४८% एवढे होते. तेव्हा महाराष्ट्रातील हेच प्रमाण ४३.४४% इतके होते. तर ३५.९७% आणि महाराष्ट्रात ३६.८६% होते. त्यानंतरच्या जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या धोरणाच्या परिणामामुळे यात आणखी बदल झाल्याचे स्पष्ट दिसून येते. या दारिद्र्यामध्ये प्रामुख्याने आदिवासी, भूमीहीन अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, दलित यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील एकूण परिस्थितीचा, मांडणीचा हा स्वतंत्र विषय आहे. परंतु एवढे मात्र खरे की, महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांकडून पिडला जाणारा पुरोगामित्वाचा ढोल हा केवळ गोरगरीब जनतेच्या फसवणूकीसाठी व त्यांचे पाठबळ मिळवण्यासाठी केलेले हे ढोंग आहे.'[२] असे म्हटले तर वावगे होणार नाही.

ऊस हे असे कृषी उत्पादन आहे की, जे अनेक मोठ्या उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करीत असते. भारतातील साखरेच्या बाजारपेठेला साखरेचे केवळ काही निश्चित प्रकारच माहित आहेत. आणि बाजारपेठ संशोधन किंवा ग्राहक संरक्षण या आवश्यकतांनुरूप जवळपास काही नाहीच. साखर उद्योग हा सहकारातील बड्या व्यक्ती तसेच भांडवलदार आणि राजकीय नेत्यांचे आवडते क्षेत्र आहे. त्यामुळेच कदाचित साखर उद्योगावर शासनाचा एवढा अंकुश आणि नियंत्रण आहे. भारत देश ऊस आणि साखरेचे माहेरघरच असायला हवे होते. कारण, किमान चौथ्या शतकापासून तरी भारतीयांना साखर बनविण्याची कला अवगत होती. भारतातील आधुनिक साखर उद्योगाचा इतिहास जेमतेम १९३० च्या दशकाच्या मध्यापर्यंत मागे जातो. १९५० च्या दशकाच्या मध्यापर्यंत साखर उद्योग जवळपास संपूर्णपणे याच राज्यांपर्यंत मर्यादीत होता. १९५० नंतर किंवा १९६० च्या दशकात प्रारंभी हा उद्योग दाक्षिणात्य आणि इतर उत्तर राज्यांमध्ये पसरला. भारत हा साखरेचा वापर करणारा जगातील सर्वात मोठा आणि साखरेचे उत्पादन करणारा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे.[३] अशा या भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये ऊसदर योग्य मिळत नाही. शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होते. अशा आर्थिक पिळवणूकीच्या काळात शेतकऱ्यांसमोर दारिद्र्य, आत्महत्या यासारखी संकटे निर्माण होतात. अशा संकटांना सामोरे जात असताना शेतकरी आपल्या न्याय्य हक्कासांठी संघटीत होऊन शासनाविरूद्ध व ऊस कारखानदारांविरूद्ध ऊस आंदोलन करताना आपणांस पहावयाला मिळतो.

प्रस्तूत प्रकरणामध्ये दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी निर्माण केलेल्या संघटनेच्या माध्यमातून शासनाविरूद्ध व ऊस कारखानदारांविरूद्ध केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीचा व आंदोलनाचा विस्तृत आढावा घेतलेला आहे.

**अर्थसंकल्प व शेतीसाठी केलेल्या तरतुदी :**

सन २००३ ते २००७ या काळात आर्थिक विकासाचा अनुभव लक्षात घेता शेतीखेरीज इतर क्षेत्रात आर्थिक विकासाचा वेग परिणामकारक आढळून आला. औद्योगिक कारखानदारीत हा विकासाचा दर वार्षिक १०% पेक्षा अधिक होता. सेवा क्षेत्रात अपेक्षीत ४% विकासदराच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षातील विकासदर मात्र २% पेक्षाही कमी आढळून आला. एकंदरीत अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचा हिस्सा, रोजगारीचा हिस्सा, निर्यात उत्पन्नाचा हिस्सा या निकषावर भारताची शेती अतिशय महत्त्वाची आहे. अजूनही या शेतीमध्ये ६०% पेक्षा अधिक लोक उपजिविका करतात. म्हणजे अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या घोषवाक्याप्रमाणे अधिक समावेशक व अधिक वेगाचा आर्थिक विकास पाहिजे असल्यास अर्थसंकल्पात वार्षिक योजनेत व पंचवार्षिक योजनेत शेती, ग्रामीण विकास, ग्रामीण रोजगार निर्मिती, लघुउद्योगधंदे यांच्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.[४] त्यासाठी २००७ च्या अर्थसंकल्पातील तरतूदीवर प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

**अर्थसंकल्पातील तरतुदी ( २००७ ) :**

शेतीचा वाटा राष्ट्रीय उत्पन्नात आता १८% असून शेतीचा विकासदर २.३% व तो चढ उताराचा राहिला. यातून ग्रामीण उत्पन्नात अनिश्चितता राहिली. यासाठी शेतीला सक्षम बनविणे आणि शेतकऱ्याला किमान उत्पन्न देणे. या बांधिलकीस पंडित नेहरू यांनी व्यक्त केलेली भूमिका अर्थमंत्र्यांनी घेतली आहे. 'सर्व इतर क्षेत्रे वाट पाहू शकतात, पण शेती नाही' यातून शेतीची आता वाट पाहण्याची कुवत संपल्याचे अर्थमंत्रीच मान्य करतात. शेतीसाठी सवलतीचा वित्तपुरवठा वाढविणे आणि अधिकाधिक शेतकरी संस्थात्मक वित्तरचनेच्या चौकटीत आणण्यास प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांना उत्कृष्ठ प्रमाणित बियाणे उपलब्ध करून देणे, त्यासाठी कृषी विद्यापीठांना भांडवली अनुदान दिले आहे. शेतीची प्रगती जलसिंचन सुविधांवर

असल्याने जलसिंचनाची वाढीव तरतूद करण्यात आली आहे. शेतीच्या वृद्धीसाठी पतपुरवठा वाढविण्यावरही भर दिलेला आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण यालाही प्राधान्य दिले आहे.[५] त्यासाठी या अर्थसंकल्पात शेती व शेतीआधारित व्यवसायासाठी ९०६५ कोटी रूपयांची तरतूद केली आहे.[६]

एकूण अर्थसंकल्प ७,५०,८८४ कोटी रूपयांचा आहे. यात शेतीसाठी अर्थमंत्र्यांनी केलेली तरतूद १% आहे. योजनेतही २.६८% एवढीच तरतूद आहे. ही तरतूद २००६-०७ वर्षापेक्षा कमी आहे. अर्थमंत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १७% उत्पन्न शेतीतून मिळते. मात्र त्यासाठी १७% तरतूद न होता १% तरतूद होते. यावरून भविष्यात काय वाढून ठेवले आहे याचा अंदाज येतो.[७]

महाराष्ट्राचे एकूण क्षेत्र ३ कोटी ७ लाख हेक्टर आहे. त्यापैकी २ कोटी १४ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली असून जमिनीची मशागत करणाऱ्या लोकांची संख्या १ कोटी २ लाख इतकी आहे. त्यापैकी ६४ लाख म्हणजे ६३% शेतकरी अल्पभूधारक आहेत. लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या किंवा खातेदारांच्या जमिनीचे सरासरी क्षेत्र २.२१ हेक्टर आहे.[८] महाराष्ट्रातील शेतजमिन व वातावरण अनेकविध पिकांच्या उत्पादनाला अनुकूल आहे. त्यामुळे महाराष्ट्रात ऊस, कापूस आणि विविध फळांचे उत्पादन घेतले जाते. ऊसाचे उत्पादन १९६०-६१ मध्ये १०४ लाख टनावरून २०००-०१ मध्ये ४९५.६९ लाख टन म्हणजे जवळपास पाचपट झाले.[९] यावरून असे दिसून येते की, भारताचे दरहेक्टरी ऊस उत्पादन ६६ टन आहे. तर महाराष्ट्रात ते ८१ टन झाले आहे.[१०] म्हणजे भारताच्या तुलनेत महाराष्ट्राचे ऊस उत्पादन बव्हंशी चांगले आहे. देश पातळीवर विचार केल्यास देशातील साखर उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा सुमारे ३३% इतका आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग हा प्रामुख्याने सहकारी क्षेत्रात विकसित झाला आहे. महाराष्ट्रात आज अखेर १५३ सहकारी साखर कारखाने व ७ खासगी साखर कारखाने कार्यरत आहेत. याशिवाय आणखी सुमारे ४० साखर कारखान्यांना


परवाने मिळाले असून त्यांची उभारणी केली जात आहे.[११] महाराष्ट्रातील साखर उद्योग व सहकारी साखर कारखाने यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. भारताच्यां साखर उद्योगात महाराष्ट्र राज्य अग्रेसर असल्याचे श्रेय मुख्यत्वेकरून सहकारी साखर कारखान्यांना द्यावे लागेल.

महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा विकास कोल्हापूर व अहमदनगर या जिल्ह्यांत झाला आहे. कोल्हापूर जिल्ह्यास गुळ उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ऊसाचे उत्पादन सर्वात जास्त आढळून येते. तर अहमदनगर या जिल्ह्यामध्ये ऊसाचे क्षेत्र जास्त दिसून येते. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ऊस व दुय्यम पीक म्हणून भात हे प्रमुख पीक घेतले जाते. कोल्हापूर जिल्ह्यातील विविध सहकारी साखर कारखाने व त्यांच्या उत्पादनांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**कोल्हापूर जिल्हा :**

कोल्हापूर हा दक्षिण महाराष्ट्रातील प्रमुख जिल्हा होय. कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७४६ चौ.कि.मी. आहे.[१२] कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कृष्णा, वारणा, पंचगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी, घटप्रभा या प्रमुख नद्यांपासून पाणी पुरवठा होतो. आणि कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण पिकाखालील क्षेत्र हे २००६-०७ मध्ये ५६८ हजार हेक्टर होते. त्यापैकी ऊस या पीकाखालील क्षेत्र ९७ हजार हेक्टर होते.[१३] यातूनच २००६-०७ साली कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ऊस पीकाचे एकूण उत्पादन ८५,७३३ मेट्रीक टन एवढे होत.[१४] कोल्हापूर जिल्ह्यात १९ सहकारी साखर कारखाने आहेत. त्यांची ठिकाणे, त्यांची गळीत उत्पादन क्षमता, त्यांनी केलेले ऊस गळीत उत्पादन, साखर उतारा पुढील प्रमाणे आहे.

## नकाशा क्र. २.१




**कोल्हापूर जिल्हा - साखर कारखाने**

१) आजरा
२) भोगावती, परिते
३) छत्रपती राजाराम
४) छत्रपती शाहू
५) दत्त, आसुर्ले-पोर्ले
६) दत्त, शिरोळ
७) दौलत
८) दुधगंगा वेदगंगा
९) गडहिंग्लज
१०) जवाहर
११) स. मंडलिक कागल
१२) कुंभी - कासारी
१३) दे.भा.र.कुंभार पंचगंगा
१४) शरद
१५) तात्यासाहेब कोरे वारणा
१६) उदयसिंह गायकवाड
१७) इंदिरा गांधी महिला
१८) डी.वाय. पाटील
१९) गुरुदत्त

## तक्ता क्र. २.१


## कोल्हापूर जिल्ह्यातील २००६-०७ मधील विविध ऊस सहकारी साखर कारखान्याचे ऊस गळीत, साखर उतारा व साखर उत्पादन अहवाल

## ( ३१ मे २००७ अखेर )


| क्र. | कारखान्याचे नांव | गळीत क्षमता | ऊसगळीत मे. टन | साखर उत्पादन क्वि. | सरासरी उतारा |
|---|---|---|---|---|---|
| १) | आजरा सहकारी साखर कारखाना, शेतगवसे | २५०० | ५२३६१० | ६२७०३० | १२.०१ |
| २) | भोगावती सहकारी साखर कारखाना, परिते | ४००० | ५४५७२५ | ६९३५२० | १२.७० |
| ३) | छ. राजाराम सहकारी साखर कारखाना, क।। बावडा | २२०० | ३७५३४६ | ४५०६३० | १२.०१ |
| ४) | छ. शाहू सहकारी साखर कारखाना, कागल | ३५०० | ६९७२५७ | ९१८८५० | १३.१७ |
| ५) | श्री. दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना, शिरोळ | ७००० | १०२५२८१ | १२६५४९० | १२.३२ |
| ६) | श्री. दत्त सहकारी साखर कारखाना, आसुर्ले-पोर्ले | २५०० | १३११५० | १४३८३० | ११.१०. |
| ७) | दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना, बिद्री | ३५०० | ६४२९०० | ८४१७०० | १३.०९ |
| ८) | दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, हलकर्णी | ३५०० | ५१७६९४ | ६१८४८० | ११.९५ |
| ९) | गडहिंग्लज तालूका सहकारी साखर कारखाना, हरळी | २००० | ३७६५४० | ४६७१० | १२.१७ |
| १०) | जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना, हुपरी | ६५०० | ११७३६७६ | १३८२०१० | ११.९० |
| ११) | कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना, कुडित्रे | ३००० | ५१४१६२ | ६६३९१० | १२.८८ |
| १२) | पंचगंगा सहकारी साखर कारखाना, इचलकरंजी | ५००० | ६४३१९३ | ७६०८४० | ११.८५ |
| १३) | सदाशिवराव मंडलिक सहकारी साखर कारखाना, हमिदवाडा | २५०० | ५२१४१४ | ६७६९६० | १३.१० |
| १४) | शरद शेतकरी सहकारी साखर कारखाना, नरंदे | २५०० | ४१४७३३ | ५१०७८८ | १२.३२ |
| १५) | वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर | ५००० | १२५५६८४ | १५४५६२० | १२.३६ |
| १६) | उदयसिंह गायकवाड सहकारी साखर कारखाना, सोनवडे | २५०० | १९६२६३ | १९०८०० | ९.८२ |
| १७) | डॉ. डी. वाय. पाटील सहकारी साखर कारखाना, वेफरफ | २५०० | ३५५१५३ | ४१४९६० | ११.६८ |
| १८) | इंदिरा गांधी सहकारी साखर कारखाना, तांबाळे | २५०० | २३३६११ | २७९१०५ | ११.८२ |
| १९) | गुरूदत्त साखर कारखाना, टाकळीवाडी | २५०० | ५६९९८० | ७१०८८० | १२.४८ |
| | कोल्हापूर जिल्हा. एकूण | ६५२०० | १०३९३३७२ | १३१६२५०३ | १२.२८ |

प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर विभाग, रेकॉर्ड[१५]


आलेख क्र. २.१ : कोल्हापूर जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याची गळीत क्षमता ( मे. टन प्रतिदिन )




आलेख क्र. २.२ : कोल्हापूर जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याचे ऊस गळीत मे. टन उत्पादन.



आलेख क्र. २.३ : कोल्हापूर जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याचे साखर उत्पादन ( क्विंटल मध्ये )



आलेख क्र. २.४ : कोल्हापूर जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याचा सरासरी ऊस उतारा




वरील सर्व आलेखावरून असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुका सहकारी साखर कारखाना, हरळी या साखर कारखान्याचे प्रतिदिन उत्पादन क्षमता सर्वाधिक राहिली आहे. तर श्री. दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना, शिरोळ या साखर कारखान्याचे प्रतिदिन उत्पादन क्षमता सर्वात कमी राहिली आहे. तसेच २००६-०७ मध्ये सर्वाधिक्र ऊस गाळप वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर या साखर कारखान्याने केले आहे. तर सर्वात कमी ऊस गाळप श्री. दत्त सहकारी साखर कारखाना, आसुर्ले-पोर्ले या साखर कारखान्याने केले आहे. तर सर्वाधिक साखर उत्पादन वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर या कारखान्याने केले. सर्वात कमी साखर उत्पादन श्री. दत्त सहकारी साखर कारखाना, आसुर्ले-पोर्ले या कारखान्याने केले आहे. तसेच सर्वाधिक साखर उतारा शाहू सहकारी साखर कारखाना, कागल या कारखान्याचा होता. तर सर्वात कमी साखर उतारा उदयसिंह गायकवाड सहकारी साखर कारखाना, सोनवडे या कारखान्याचा होता. कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी २००६-०७ या गळीत वर्षात १०७१३३७२ मे. टन ऊस गाळप केला आहे. तर साखर उत्पादन १३१६२५०३ क्विंटल इतके केले आहे. सरासरी साखर उतारा १२.२८% राहिला आहे.

**सांगली जिल्हा :**

दक्षिण महाराष्ट्रातील महत्त्वाचा जिल्हा सांगली होय. सांगली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ८५७२ चौ.की.मी. आहे.[१६] सांगली जिल्ह्यास कृष्णा, वारणा, येरळा, माण, बोर या नद्यांपासून पाणी पुरवठा होतो. सांगली जिल्ह्याचे २००६-०७ साली एकूण पीकाखालील क्षेत्र ८०२ हजार हेक्टर होते. त्यामध्ये ऊस पीकाखालील क्षेत्र ५४ हजार हेक्टर होते.[१७] २००६-०७ साली सांगली जिल्ह्यात ऊसाचे एकूण उत्पन्न ४९७३० मेट्रीक टन होते.[१८] सांगली जिल्ह्यात १५ सहकारी साखर कारखाने आहेत. त्यांची ठिकाणे, त्यांची गळीत उत्पादन क्षमता, त्यांनी केलेले ऊस गळीत उत्पादन, साखर उतारा पुढील प्रमाणे आहे.

## नकाशा क्र. २.२


सांगली जिल्हा
सांगली जिल्हा - साखर कारखाने
२) हुतात्मा किसन अहिर
४) महांकाली
७) राजारामबापू पाटील
१०) वसंतदादा, सांगली
१२) यशवंत, खानापूर.
१३) राजारामबापू - वाटेगांव शाखा
१४) क्रांती
१५) मोहनराव शिंदे
१६) सर्वोदय


## तक्ता क्र. २.२

## सांगली जिल्ह्यातील २००६-०७ मध्ये विविध ऊस सहकारी साखर कारखान्यांची गळीत क्षमता, साखर उत्पादन, सरासरी उतारा ( ३१ मे २००७ अखेर )


| क्र. | कारखान्याचे नांव | गळीत क्षमता | ऊसगळीत मे. टन | साखर उत्पादन क्वि. | सरासरी उतारा |
|---|---|---|---|---|---|
| १) | डोंगराई सागरेश्वर सहकारी साखर कारखाना, कडेपूर | २५०० | २८५६०३ | ३००००० | १०.३७ |
| २) | हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना, वाळवा | १२५० | ५७९४२७ | ७३५२५० | १२.७० |
| ३) | राजे विजय डफळे सहकारी साखर कारखाना, जत | २५०० | ३८४३९३ | ४१२६०० | १०.७५ |
| ४) | महांकाली सहकारी साखर कारखाना, कवठेमहांकाळ | १२५० | ४३९२७७ | ४९८५०० | ११.३५ |
| ५) | माणगंगा सहकारी साखर कारखाना, आटपाडी | १२५० | ३५४८३९ | ४१७५०० | ११.७८ |
| ६) | निनाईदेवी सहकारी साखर कारखाना, कोकरूड | १७५० | १०३१६३ | १०३२३९ | १०.०२ |
| ७) | रा.बा. पाटील साखराळे, | ४००० | ८११९१९ | १०००२८६ | १२.३२ |
| ८) | सोनहिरा सहकारी साखर कारखाना, वांगी | २५०० | ४०७००१ | ४४९५०० | ११.०५ |
| ९) | तासगांव सहकारी साखर कारखाना, तासगांव | १७५० | ३२१२२५ | ३५७६७५ | ११.२० |
| १०) | वसंतदादा सहकारी साखर कारखाना, सांगली | ५००० | ८३५८०४ | ९२४८९० | ११.२२ |
| ११) | विश्वासराव नाईक स. सा. कारखाना, चिखली | १२५० | ४३७३६० | ५३४६२० | १२.२५ |
| १२) | यशवंत सहकारी साखर कारखाना, नागेवाडी | १२५० | २०६९०७ | २३११४० | ११.५१ |
| १३) | क्रांती सहकारी साखर कारखाना, कुंडल | २५०० | ४३३१७४ | ५४४८५० | ११.५१ |
| १४) | सर्वोदय सहकारी साखर कारखाना, कारंदवाडी | २५०० | ३४३१७४ | ३८७४९० | ११.११ |
| १५) | मोहनराव शिंदे सहकारी साखर कारखाना, मिरज | २५०० | ३४७७४० | ६४५९५० | ११.५१ |
| | सांगली जिल्हा, एकूण | ३३७५० | ६५६५४६२ | ७५४३४९० | ११.३७ |

प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर विभाग, रेकॉर्ड[१९]


आलेख क्र. २.५ : सांगली जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याची गळीत क्षमता ( मे. टन मध्ये प्रतिदिन )



आलेख क्र. २.६ : सांगली जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याचे ऊस गळीत मे. टन उत्पादन




आलेख क्र. २.७ : सांगली जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याचे साखर उत्पादन ( क्विंटल मध्ये )






15234

आलेख क्र. २.८ : सांगली जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील विविध साखर कारखान्याचा सरासरी ऊस उतारा



वरील सर्व आलेखावरून असे दिसून येते की, सांगली जिल्ह्यातील श्री. वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली या साखर कारखान्याची गाळप क्षमता सर्वाधिक आहे. तर सर्वात कमी गाळप क्षमता हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना, वाळवा, महांकाली सहकारी साखर कारखाना, कवठे महांकाळ, माणगंगा सहकारी साखर कारखाना, आटपाडी, विश्वासराव नाईक सहकारी साखर कारखाना, चिखली, यशवंत सहकारी साखर कारखाना, नागेवाडी या साखर कारखान्यांची आहे. तसेच २००६-०७ च्या गळीत हंगामात श्री. वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली या साखर कारखान्याने सर्वाधिक ऊस गाळप केले आहे. तर सर्वात कमी ऊस गाळप निनाईदेवी सहकारी साखर कारखाना, कोकरूड या साखर कारखान्याने केले आहे. साखर उत्पादनांत सर्वाधिक उत्पादन राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना, साखराळे या साखर कारखान्याने केले आहे. तर सर्वात कमी साखर उत्पादन निनाईदेवी सहकारी साखर कारखाना, कोकरूड या साखर कारखान्याने केले आहे. तसेच सर्वाधिक सरासरी साखर उतारा हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना, वाळवा तर सर्वात कमी साखर उतारा निनाईदेवी सहकारी साखर कारखाना, कोकरूड या साखर कारखान्याचा राहिला आहे. सांगली जिल्ह्यात २००६-०७ च्या गळीत हंगामात एकुण ऊस गाळप ६५६५४६२ मे. टन झाले आहे. एकुण साखर उत्पादन ७५४३४९० क्विंटल झाले आहे. तसेच सरासरी साखर उतारा ११.३७% राहिला आहे.

दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी २००६-०७ या गळीत हंगामात १७२७८८३४ मे. टन ऊस गाळप केला आहे. याचा साखर उतारा सरासरी ११.६८% एवढा राहिला आहे. हा साखर उतारा इतर राज्याहून अधिक असल्याचे दिसून येते. तरीही दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी किमान वैधानिक किंमतीनुसार दर दिला नाही. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलने केली आहेत. तत्पूर्वी शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्रातील ऊसाची किंमत :**

ऊसाची लागवड ही ऊसाला मिळणाऱ्या किंमतीवर आणि ऊस उत्पादनाच्या खर्चावर आणि ऊसाचे एकंदर उत्पादन यावर अवलंबून असते. गेल्या काही वर्षातील आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते. पण एखाद्या वर्षातला अनुभव दुसऱ्या वर्षी उलटा अनुभव देतो. म्हणजे ज्यावर्षी ऊसाला चांगला दर मिळतो. त्यावर्षी ऊसाची अधिक लागवड होते. परिणामी ऊसाचा पुरवठा वाढून दर घटतो. दुसऱ्या वर्षी ऊसाची लागवड कमी होते. पण ऊसाचा दर वाढतो. ऊसाचा पुरवठा अखंड ठेवून गरजेइतकी साखर उत्पादन होण्याच्या दृष्टीने ऊसाचा दर योग्य प्रमाणात ठेवणे गरजेचे असते. पण महाराष्ट्रातील ऊसाचा दर मागणी पुरवठ्याच्या शक्तीवर ठरत नाहीत. कारखाना व्यवस्थापनाच्या प्रक्रियेतला हा एक प्रकार आहे. (श्री. श्रीपाल १९६७) सहकारी साखर कारखान्याच्या मूळ घटनेतल्या उपविधीतील कलमानुसार ऊसाचा दर ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारकडे जातो. सरकारने ठरवून दिलेला ऊसाचा दर सर्व कारखान्यांना बंधनकारक असतो. पण ज्या कारखान्यांनी आपल्या एकंदर शेअरपैकी शासनाचे सर्व शेअर्स परत केले आहेत आणि शासनाचे कोणत्याही प्रकारचे कर्ज कारखान्यावर नाही. अथवा कोणत्याही प्रकारच्या कर्जावर शासनाची हमी नाही. अशा साखर कारखान्यावर शासनाने ठरवून दिलेल्या दराचे बंधन नाही. पण असे कारखाने क्वचितच आहेत. किंबहुना शासनाच्या मदतीशिवाय कारखाने उभारता येत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. सहकारी साखर कारखान्याच्या उपविधीतील तरतुदीनुसार शासनाला ऊसाच्या किंमतीचा अधिकार प्राप्त झाला आहे.[२०]

ऊसाची किंमत ठरविण्यासाठी फेब्रुवारी १९९४ मध्ये आयोजित केलेल्या राज्यपातळीवरच्या सहकार व साखर मंत्रालयाच्या परिषदेने अशी विनंती केली की, राज्य सरकारांनी द्यावयाच्या अंतिम किंमतीचा अभ्यास करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने एक उच्चस्तरीय समिती नेमावी. त्याप्रमाणे केंद्र सरकारने एक मंत्री समिती नियुक्त केली.[२१] या समितीने ऊसाच्या किंमतीसंबंधी शिफारस करावी असे सूचित करण्यात

आले. 'ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी साखर कारखान्याला ऊस पुरविल्यानंतर साखर कारखान्यांनी निर्धारित केलेल्या दराने ॲडव्हान्स बिल पंधरा दिवसाच्या आत देण्याचे बंधन आहे. ॲडव्हान्स दरसुद्धा मंत्री समिती ठरवत असते. कारखान्यांची आर्थिक परिस्थिती, साखरेचे पुढील वर्षातील दर, सरकारचे धोरण इ. गोष्टींचा अंदाज बांधून ॲडव्हान्स दिला जातो. साखर कारखान्यांमध्ये स्पर्धा होवून नये याचीही काळजी घेतली जाते. ॲडव्हान्स दर हंगाम सुरू होण्याअगोदर जाहीर करावा लागतो. गळित हंगाम संपल्यानंतर साखर उत्पादनाचा खर्च वजा करून शिल्लक राहणारे उत्पन्न ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्यामध्ये त्यांनी पुरविलेल्या ऊसाच्या प्रमाणानुसार गरज पडल्यास दुसरे ॲडव्हान्स बिल म्हणून दिले जाते. किंवा अंतिम दर निर्धारित केला जातो. त्या बिलातून वेगवेगळ्या कपाती वजा केल्यानंतर शिल्लक उत्पन्न अंतिम दर म्हणून वाटले जाते. त्या दराने बिल वाटण्या अगोदर मंत्री समितीची संमती असावी लागते. त्यासाठी प्रत्येक कारखान्यांनी ठराविक नमुन्यामध्ये साखर संचालकाकडे आपला उत्पन्न खर्चाचा तपशील पाठवून द्यावा लागतो. आणि अंतिम दर निश्चितीची किंमत करावी लागते. साखर संचालक सर्व कारखान्यांचा तपशील मुख्यमंत्री अध्यक्ष असलेल्या मंत्री समितीला सादर करतात. मंत्री समितीकडून ढोबळ मार्गदर्शक तत्त्वे सांगितली जातात. मंत्री परिषदेने आखून दिलेल्या पद्धतीने ऊस दराच्या अंतिम किंमती देण्याबाबतचे आदेश साखर आयुक्तांकडून अर्ज केलेल्या कारखान्यांना पाठवून दिला जातो. त्यामुळे प्रत्येक कारखान्याचा दर निश्चित करण्याचा अंतिम अधिकार या मंत्री समितीला प्राप्त झाले आहेत.[२२]

मंत्री समिती प्रामुख्याने ऊसाचे दर दोन प्रकारे ठरवते. १) एक्स फिल्ड. २) एक्स गेट. पहिल्या प्रकारात ऊसाचा दर शेतावरच निश्चित केला जातो. तर दुसऱ्या प्रकारात साखर कारखान्याच्या गेटवर ऊसाचा दर निश्चित केला जातो. ऊसाची अंतिम किंमत निर्धारित करित असताना मंत्री समिती खालील गोष्टींचा विचार करते.

१) गाळप केलेला ऊस,
२) साखर उत्पादन,
३) साखर उतारा,
४) साखरेची विक्री,
५) साखरेचा साठा,
६) साखरेचा लेव्ही दर,
७) खुल्या बाजारातील साखरेचा दर,
८) संपत कमिटीच्या शिफारशीप्रमाणे मिळणाऱ्या सवलती,
९) खोडव्याचा खर्च, खोकडी,
१०) बोनस
११) शिक्षण फंड
१२) ऑडीट फी
१३) साखर संघाची वर्गणी
१४) पगार, मजुरीची देय रक्कम,
१५) ऊस तोडणी व वाहतुक खर्च,
१६) घसारा, १७) तोटा इ.

या घटकांचा विचार केला जातो तसेच मंत्री समिती मार्गदर्शक तत्त्वांचाही विचार करते. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे –

१) हंगामासाठी ऊसाचा किमान दर.

२) साखर कारखाना नवा आहे का जुना आहे.

३) परिसरातील साखर कारखान्यांनी द्यावयाचा ऊसाचा दर इ. गोष्टींचा विचार केला जातो.[२३] याप्रकारे महाराष्ट्रामध्ये ऊसाची किंमत निश्चित केली जाते. तर प्रतिटन ऊस गाळपापासून येणारा साखर उत्पादन खर्च पुढील प्रमाणे आहे.

**साखर उत्पादन खर्च :**

ऊसावर प्रक्रिया करून साखर निर्मिती करण्यास येणाऱ्या खर्चामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

१) ऊस तोडणी व वाहतुक खर्च

२) ऊस खरेदी कर

३) रूपांतर खर्च : गव्हाणी खर्च, भांडार खर्च, रसायने, मजूरी, पगार इत्यादी घटकांवरचा खर्च

४) व्याज

५) घसारा

६) इतर खर्च : ऑडीट फी, खोडकीवर दिलेला दर, सर्व प्रकारच्या कपाती, वर्गणी इत्यादी.

७) संचित तोटा. इत्यादी घटकांचा साखर उत्पादन खर्चामध्ये समावेश होतो.[२४]

साखर उत्पादन खर्चामध्ये वरील सर्व घटकांवर होणारा एकूण खर्च हा सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापन व नियोजनावर अवलंबून असतो. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांचा साखर उत्पादन खर्च ऊसाची किंमत सरासरी प्रतिटन रू. ७०० ते ७५० इतकी धरून प्रतिटन रू. १४०० ते १६०० साखर उत्पादनास खर्च येतो. प्रतिटन ऊसापासून सरासरी १०० ते १२० किलो साखर तयार होते. तयार झालेली साखर रू. १२ प्रतिकिलो दराने बाजारात विकली तर रू. १२०० ते १४०० साखर कारखान्यांना मिळतात असे दिसून येते.

**ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या :**

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचा विकास करताना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमालावर प्रक्रिया करून, साखर उत्पादन करून विकल्यास त्यांना अधिक उत्पन्न मिळेल. खासगी साखर कारखानदारांच्या पिळवणूकीतून त्यांची मुक्तता होईल. हा मुख्य उद्देश होता. परंतु अलिकडील काळात सहकारी साखर कारखानदारीत वाढलेली स्वाहाकाराची भ्रष्टाचारी प्रवृत्ती, राजकीय सत्ता मिळविण्यास साखर कारखानदारीचा वापर, त्यातून निर्माण झालेली गटबाजीची स्पर्धा यामध्ये शेतकऱ्यांच्या हिताचा बळी दिला गेला.[२५] त्यामुळे शेतकऱ्यांच्या विकासासाठी सहकारी साखर कारखानदारी सुरू होऊन सुद्धा तिच्यामुळे शेतकऱ्यांवर बिकट परिस्थिती येऊन आज तो कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे आज शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे त्याचा आढावा पुढील प्रमाणे.

**१ ) ऊसाच्या न परवडणाऱ्या किंमती :**

ऊस उत्पादक शेतकऱ्याने ऊस खासगी साखर कारखानदाराला विकल्यास साखरेच्या उत्पादनातील नफा खासगी कारखानदाराला मिळेल. त्याऐवजी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्वावर ऊसावर प्रक्रिया करून साखर तयार करून ती विकल्यास तो नफा ऊस उत्पादक शेतकऱ्याला मिळेल व त्याची उन्नती होईल हा विचार सांगितला होता. त्यामुळे साखरेच्या उत्पादनाचा इतर सर्व खर्च वजा करून राहिलेल्या किंमतीपासून शेतकऱ्याच्या ऊसास अंतिम दर देण्यात येऊ लागला होता. शेतकऱ्यांनी साखर कारखानदारांवर टाकलेला विश्वास व त्यांच्यामधील जागरूकतेचा अभाव याचा साखर कारखानदारांनी फायदा उठविला. स्वत:च्या हितासाठी साखर कारखानदारांनी कारखान्यांचा वापर केला. त्यातूनच गैरव्यवस्थापन, अतिरिक्त पैशाची उधळपट्टी व भ्रष्टाचार हे बहुतेक साखर कारखान्यांचे वैशिष्ठ्य बनून आर्थिक आजारपणाचे संकट आले आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाची किफायतशीर किंमत मिळेनाशी झाली.

१९९७-९८ च्या गळीत हंगामात प्रतिटन १०००/- रूपये पर्यंत असलेला ऊसाचा दर गेल्या तीन-चार वर्षात घसरत जाऊन तो ८०० ते ८५० रूपयेपर्यंत खाली आला आहे. तर २००२-०३ च्या हंगामात महाराष्ट्रातील बहुतांश कारखान्यांनी फक्त ५६०/- रूपये प्रतिटन पहिला ॲडव्हान्स दिला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सांगली जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांनी ७५०/- रूपये प्रतिटन प्रमाणे पहिला हप्ता दिला. पण त्यासाठी २००२-०३ च्या गळीत हंगामाच्या सुरवातीला ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन केले होतो. ७५०/- रूपये प्रतिटन या प्रमाणे पहिला हप्ता दिल्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यात बहुतेक साखर कारखान्यांनी दुसरा हप्ता म्हणून ५०/- रूपये दिले. आता तर ऊसाची किमान वैधानिक किंमत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देणे अशक्य असल्याचे साखर कारखानदारांकडून दिसून येत आहे.[२६] सन २००२-०३ च्या

गळीत हंगामात ऊसाचा पहिला हप्ता ५६०/- रूपये प्रतिटन याप्रमाणे मिळाला. तर दुसऱ्या बाजूस केंद्र सरकारने खतावरील सबसिडी कमी केली. त्यामळे शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या खतांच्या किंमतीत वाढ झाली. पाणीपट्टी व वीज दरात वाढ झाली. इतर शेती साधनांच्या किंमती वाढल्या. परिणामी ऊसाचा उत्पादन खर्च वाढत गेला. मात्र दुसऱ्या बाजूला ऊसाचा दर कमी होत गेला. सन २००२-०३ या हंगामातील अंतिम बिले साखर कारखानदारांकडून दिली नाहीत. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांपुढे आर्थिक संकटे उभी राहिली होती. तर २००३-०४ च्या गळीत हंगामासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील व सांगली जिल्ह्यातील काही कारखान्यांनी ८००/- रूपये प्रतिटन पहिला हप्ता दिला. ही रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना परवडणारी नव्हती.[२७]

**२ ) ऊसावरील रोगांचे संकट :**

ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात असतानाच ऊसावर पडणाऱ्या रोगांमूळे ऊसाचे नुकसान होते. पांढरा लोकरी मावा या रोगाचा प्रादुर्भाव ऊसावर होतो. कोल्हापूर जिल्ह्यात २००३-०४ च्या गळीत हंगामासाठी १ लाख ९ हजार हेक्टर ऊसाची नोंद झाली. त्यापैकी ५० हजार हेक्टर क्षेत्रातील ऊस मावाग्रस्त झाला. या रोगाचा प्रादुर्भाव कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर, नाशिक या जिल्ह्यांतही झाला. अशा प्रकारच्या रोगांवर नियंत्रण करण्यासाठी मूलभूत संशोधनाकडे सरकारने व साखर कारखान्यांनी दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट दिसते. यावर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नाही. या रोगांमुळे ऊसाच्या वजनात घट होते. त्यामुळे शेतकऱ्यांवर नवीन संकट ओढवले आहे.[२८]

**३ ) ऊसाची अल्प उत्पादकता :**

दक्षिण महाराष्ट्रामध्ये ऊसाची उत्पादकता अल्प प्रमाणात होत चालल्याचे दिसून येते. कारण दक्षिण महाराष्ट्रास कृष्णा, पंचगंगा, वारणा, हिरण्यकेशी या प्रमुख नद्यांपासून पाणीपुरवठा होतो. मात्र पावसाळ्यात या नद्यांना महापूर येतात. त्यामुळे शेती पूर्णपणे पाण्याखाली जाते. ऊस पाण्यात जास्त काळ राहिल्याने उत्पादनात घट होते.

**४ ) ऊस बेणे व खतांची समस्या :**

ऊस उत्पादक **शेतकऱ्यांना** निरोगी व उत्तम प्रतीचे बेणे लागवड करण्यासाठी मिळत नाही. उत्पादन वाढविण्यासाठी उत्तम प्रतीच्या बेण्याची गरज असते. याबरोबर ऊसासाठी लागणारी खते ही वेळेवर शेतकऱ्यांना मिळत नाहीत. तसेच या खतांचे दर योग्य नाहीत. या समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते.

**५ ) साखर कारखान्यांचे नियोजन व वाहतूक व्यवस्था :**

दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडून ऊस उत्पादन व गाळप करणे याबाबत योग्य नियोजन होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे ऊस तोडणी पासून कारखान्यात पोहचवण्यापर्यंत जास्त कालावधी लागतो. याचे नियोजन नसल्याचे दिसून येते. तसेच वाहतूकीवर जास्त खर्च होत आहे. वाहतूक करताना ऊसाची नासधूस होते, कारखान्यांवर ऊसाच्या वजनाबाबत तफावत दिसून येते. वाहतूकीचे योग्य नियोजनाचा अभाव असल्यामुळे शेतकऱ्यांना हा तोटा सहन करावा लागते.

शेतीमध्ये आधुनिक अवजारांचा वापर कमी व पारंपारिक शेती अवजारांचा वापर जास्त होत आहे. त्यामुळे उत्पादन वाढ खुंटत चालली आहे. या विविध समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. या समस्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न झाले ते पुढील प्रमाणे.

**ऊस उत्पादक शेतकऱ्यांना संघटीत करण्यासाठी झालेले प्रयत्न :**

दक्षिण महाराष्ट्रामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना स्वत:च्या ऊसास योग्य भाव मिळत नव्हता. साखर कारखानदार शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. या पिळवणूकीविरोधी व ऊसास उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळण्यासाठी शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न झाले. दक्षिण महाराष्ट्रात आमदार राजू शेट्टी यांनी हा प्रयत्न केल्याचा दिसून येतो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या अडचणी, समस्या सोडविण्यासाठी एकत्र करण्याचे काम केले. त्यासाठी राजू शेट्टी यांनी फेब्रुवारी २००४ मध्ये 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' स्थापन केली. व या माध्यमातून शेतकऱ्यांच्या

प्रश्नावर जनआंदोलने उभारली. तसेच विधानसभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठविला. विविध ऊस परिषदा घेतल्या व त्याद्वारे शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केले. आणि सभा, मेळावे, मोर्चे या मार्गांचा वापर करून शेतकऱ्यांना संघटीत केले. या सभा, मेळाव्यांमध्ये शेतकऱ्यांना आपले हक्क समजावून सांगितले, व्यापक लढे उभारण्यास संघटीतपणे आंदोलन करण्याची गरज आहे. याचे महत्त्व पटवून दिले. तसेच राज्यकर्त्यांची धोरणे शेतकऱ्यांच्या बाबतीत कशी अन्यायी आहेत. हे दाखवून शेतकऱ्यांना एका छत्राखाली आणण्याचे महत्त्वाचे प्रयत्न त्यांनी केले.

**दक्षिण महाराष्ट्रातील ऊस आंदोलनाची पार्श्वभूमी :**

दक्षिण महाराष्ट्रात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी संघटीत होऊन ऊसास 'किमान वैधानिक किंमत' मिळविण्यासाठी आंदोलन केले. हे आंदोलन शेतकऱ्यांनी उभारले. कारण ११ नोव्हेंबर २००६ रोजी साखर कारखानदार, स्वाभिमानी शेतकरी संघटना व पुढारीचे संपादक प्रतापसिंह जाधव यांच्यात 'समझोता करार' झाला. या करारात असे ठरले होते की, २००६-०७ च्या गळीत हंगामास ऊसदर १२८०/- रूपये देण्यात येईल. आणि या १२८०/- भावातील ९००/- रूपये पहिला हप्ता दिला जाईल. तर दुसरा ३८०/- रूपयेचा हप्ता सहा आठवड्यात देण्यात येईल. अशा प्रकारचा करार झालेला असताना साखर कारखानदारांनी हा करार मोडीत काढला. ९००/- रूपयेचा पहिला हप्ता दिला. मात्र ३८०/- रूपयेचा दुसरा हप्ता पाच महिन्याचा कालावधी होऊन गेला तरी शेतकऱ्यांना मिळाला नाही. हा ३८०/- रूपयेचा ऊसदराचा दुसरा हप्ता मिळविण्यासाठी दक्षिण महाराष्ट्रात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ऊस आंदोलन केले.[२९] त्या ऊस आंदोलनाचा सखोल अभ्यास दोन टप्प्यात पाहणार आहोत.

**दक्षिण महाराष्ट्रातील ऊस आंदोलनाचा पहिला टप्पा :**

दक्षिण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी ऊसास किमान वैधानिक किंमतीनुसार भाव मिळावा. यासाठी आंदोलन उभारले. त्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी १३ दिवसांची

'निर्धार यात्रा' काढली. निर्धार यात्रा हे एक आत्मक्लेशाचे आंदोलन आहे. हे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले. आणि ऊसदराच्या ३८०/- रूपये दुसऱ्या हप्त्यासाठी हे आंदोलन उभारले. कोणत्याही परिस्थितीत हा दुसरा हप्ता मिळवायचा असा निश्चय करून दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन उभारले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ३८०/- रूपयेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी १३ दिवसांत ३८० कि.मी. अंतर पायी चालत जाण्याचा निर्धार केला. १९ एप्रिल २००७ रोजी गुरूवारी सकाळी ८.३० वाजता आमदार राजू शेट्टींनी शिरोळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महाराणी ताराराणीच्या गादीस अभिवादन केले व ऊस आंदोलनास सुरूवात केली. शिरोळ येथील शिवाजी चौकात झालेल्या सभेत ते म्हणाले "साखर कारखानदारांनी केलेला करार पाळला नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन उभारले आहे." पुढे निर्धार यात्रेबद्दल आमदार राजू शेट्टींनी १३ दिवसांचे प्रयोजन स्पष्ट केले. आणि निर्धार यात्रेस शिरोळच्या शिवाजी चौकातून सुरवात केली.[३०] निर्धार यात्रा दुपारी ४.०० वाजता हातकणंगले तालुक्यातील इचलकरंजी या गावी पोहोचली. या आंदोलकांचे स्वागत टाकवडे वेस येथे केले होते. त्यानंतर पहिला मुक्काम 'रांगोळी' या गावी झाला. त्यावेळी आंदोलकांची सभा झाली या सभेत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्याबद्दल चर्चा झाली.[३१] २० एप्रिल २००७ रोजी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची निर्धार यात्रा दुपारी १२.०० वाजता 'कसबा सांगाव' येथे पोहोचली होती. आंदोलकांचे तेथे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले गेले. आणि हजारो शेतकरी या आंदोलनामध्ये सामील झाले.[३२]

स्वाभिमानी शेतकरी आंदोलक २१ एप्रिल २००७ रोजी कागल तालुक्यात पोहचले होते. तेथील वाघजाई डोंगर चढताना आंदोलकांचे पाय दुखावले. मात्र ते आपल्या हक्कासाठी चालले होते.[३३] निर्धार यात्रेच्या चौथ्या दिवशी म्हणजे २२ एप्रिल २००७ रोजी शेतकऱ्यांना एकत्रीत करण्यास आंदोलकांपैकी एक शेतकरी शंकर पाटील यांनी कवणे सादर केली. दुपारी ३.३० नंतर ऊसाच्या ३८०/- रूपयेच्या दुसऱ्या

हप्त्यासाठी निर्धार पक्का असलेले आंदोलक गडहिंग्लज कडे गेले. या मार्गावर 'आमदार नही आँधी है। किसानोंका गांधी है।', '३८०/- घेणारच' या प्रकारच्या घोषणा आंदोलक शेतकरी देत होते.[३४] यानंतर क्रमाक्रमाने आंदोलक कागल तालुक्यात 'आणुर' या गावी आले होते. 'सर्व धर्म समभाव रे शेतकरी हिच आमूची जात रे!' हे ब्रिदवाक्य आणि शेतकऱ्यांच्या विकासाचे स्वप्न उराशी घेऊन शेतकऱ्यांनी मार्गक्रमण केले होते. मार्गक्रमण करत असताना 'चला सामील होवू निर्धाराच्या दिंडीत आणि चोरांना पकडूया अडचणींच्या खिंडीत' अशी गीते गात होते. प्रत्येक दिवशी संध्याकाळच्या सभेत आंदोलक शपथ घेत होते. ती अशी की, 'मी शपथ घेतो की, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे लाचारीचे जीवन संपवून त्यांना देशातील इतर नागरिकांप्रमाणे सुखाने व सन्मानाने जगता यावे, या करिता सर्व शक्तीने प्रयत्न करेन. या प्रयत्नात जात, पात, धर्म, पक्ष, पंथ इत्यादी कोणत्याही भेदाभेदांचा अडथळा येवू देणार नाही.'[३५] यावर आ. राजू शेट्टी म्हणतात की, "निर्धार यात्रा म्हणजे आत्मक्लेषाचे आंदोलन आहे. गांधीजींच्या पद्धतीने केलेल्या या आंदोलनामुळे कारखानदारांना जाग न आल्यास शेतकरी शस्त्रे हाता घेतील. मग मात्र शेतकऱ्यांना आवरणे कठीण होईल. याचे भान ठेवून ऊसाचा ३८०/- रूपयांचा दुसरा हप्ता साखर कारखानदारांनी त्वरित द्यावा."[३६] तसेच आंदोलकांची निर्धार यात्रा कोल्हापूर मध्ये आल्यानंतर 'प्रथम जिल्हाधिकारी मा. प्रविण दराडे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ते निवेदन असे होते की, "११ नोव्हेंबर २००६ रोजी झालेल्या करारानुसार ऊस ॲडव्हान्स मधील ३८०/- रूपये प्रतिटन मिळावेत म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने 'न भुतो, न भविष्यती', निर्धार यात्रा काढली. ३८० कि.मी. चे अंतर राजू शेट्टी व शेकडो शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी उन्हातान्हाची, डोंगरदऱ्यांची पर्वा न करता १९ एप्रिल २००७ पासून सुरू केली. दररोज २८ ते ३५ कि.मी. अंतर पायी चालून तेराव्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रचंड संख्येने शेतकरी एकत्र आले. तेव्हा आमदार राजू शेट्टींनी भाषण केले. त्या भाषणामध्ये ते म्हणतात की, "महाराष्ट्र दिनी १०५ हुतात्म्यांनी

रक्त सांडल्यानंतर ५० वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. गोरगरिबांचे, कष्टकऱ्यांचे व शेतकऱ्यांचे राज्य आले म्हणून महाराष्ट्राची जनता आनंदली. पालकमंत्र्यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त थाटामाटाने ध्वजवंदना केली असेल. परंतु ध्वजवंदना करताना गरीबी, कर्जबाजारीपणा आणि नुकसानीतील शेती करणारा शेतकरी व कष्टकरी यांचा विचार पालकमंत्र्यांच्या मनात कितपत आला असेल? अर्थात मुख्यमंत्री व पालकमंत्री यांच्या निवेदनावरून त्यांच्या मनात शेतकऱ्यांच्या दुखा:बद्दल किती आस्था आहे हे दिसून आलेले आहे. या गळीत हंगामात ऊस जास्त प्रमाणात असल्याने २००६-०७ च्या साखरेचे दर कोसळणार हे लक्षात घेवून शेतकरी संघटनेने कोणतीही दुराग्राही भूमिका न घेता, सामोपचाराने १२८०/- रूपये प्रतिटन दरासाठी साखर कारखानदारांच्या प्रतिनिधी मंडळाशी करार केला होता. हा करार साखर कारखान्यांनी पाळला नाही. पण मुख्यमंत्र्यांनी मात्र 'हा शेतकरी व कारखानदार यांच्यामधला प्रश्न आहे व शासनाचा या प्रश्नाशी संबंध नाही.' असे बेजबाबदारपणाचे विधान करून हात झटकले आहेत.'' या प्रश्नांशी निगडीत सर्व मुद्यावर आ. राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्र्यांना पत्रे पाठवली आहेत. त्यांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. पण मुख्यमंत्री व पालकमंत्री यांच्या निवेदनावरून व मागील काही महिन्यातील शासनाच्या भूमिकेवरून खात्री झाली आहे. की ऊस दरा बाबतीत शासनामध्ये शेतकऱ्यांच्या कल्याणासाठीच्या निम्नतम गोष्टी करण्याची सुद्धा शक्ती नाही. उलट अकार्यक्षम, ढिसाळ व लाचखोर कारखानदारांची बाजू शासन घेते व त्यांना आर्थिक पॅकेजेस व करामध्ये सवलती देत आहे. शासनाची ही बेजबाबदार आणि धक्कादायक भूमिका लक्षात घेता शेतकऱ्यांच्या ऊसाचे दर कसे ठरवायचे व पैसे कसे वसूल करायचे हे आम्ही शेतकरीच ठरवणार. शेतकऱ्यांच्या प्रश्नाशी जर शासनाचा संबंध नाही. आता फक्त शेतकरी, साखर कारखानदार यांच्या मधील अंतर्गत प्रश्न आहे. शेतकरी जरी गांधीवादी आणि शांतता, समृद्धी व कल्याणाचे पाईक असला तरी हा प्रश्न सोडवताना जर लाखो शेतकऱ्यांचा व त्यांच्या तरूण मुलांचा संयम सुटून काही अवांछित घटना

घडल्या तर त्यावेळीही शासनाने हा प्रश्न अंतर्गत आहे असा समजावा. त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली पोलिस व न्यायालयीन कारवाई करण्याच्या फंदात पडू नये. कारण हा प्रश्न लाखो शेतकरी कुटूंबाच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. लाखो शेतकरी कुटुंबाच्या जगण्यासाठीचा लढा हा गुन्हा ठरत नाहीत. तर ही एक सार्वत्रिक क्रांती आहे. यापुढे ऊसाचे ३८०/- रूपये प्रतिटन हा दर घेतल्याशिवाय शेतकरी शांत राहणार नाहीत. हे स्पष्टपणे सांगून निवेदन संपवतात.'' शेतकरी जगले तर कोण मरेल? शेतकरी मेले तर कोण जगेल?[३७] याही पुढे जाऊन राजू शेट्टी म्हणाले की, ''साराबंदी, करबंदी आंदोलन सुरू करू. जबाबदारी झटकणारे सरकार मान नाही.' शेतकरी कर्जबाजारी रहावा. म्हणूनच 'साखर निर्यातीवर बंदी घातली गेली, मात्र शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. आडवे येणाऱ्यांची हत्या करतील.'' या सभेमध्ये राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या मांडल्या आहेत त्या पुढील प्रमाणे.

१) ऊसाची 'किमान वैधानिक किंमत' याप्रमाणे साखर कारखान्यांनी पूर्ण रक्कम ताबडतोब अदा करावी.

२) किमान वैधानिक किंमत देताना हप्ते करू नयेत. ते एकरकमी द्यावेत.

३) रक्कम मिळून चेक वटेपर्यंत होणाऱ्या काळात नियमानुसार १५% व्याज मिळावे.

४) किमान वैधानिक किंमती मधून तोडणी व वाहतुक खर्च वजा करू नये.

इत्यादी मागण्या मांडल्या होत्या. व त्यासाठी १४ दिवसांची मुदत देण्यात आली होती. अन्यथा न्यायालयीन कारवाई करण्याच्या आदेशाची नोटीस सहकारी साखर कारखान्यांना देण्यात आली होती.[३८]

**दक्षिण महाराष्ट्रातील ऊस आंदोलनाचा दुसरा टप्पा :**

दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यांत विविध सहकारी साखर कारखान्यांवर काढलेले मोर्चे, रॅली, उपोषण, बंद आणि घेतलेल्या सभा यांचा समावेश होतो. आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये आंदोलकांनी प्रथम, 'शिरोळच्या दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्यातून बाहेर पडणारी

साखरेची वाहतूक रोखली. मात्र वाहतुकदारांच्या संघटनेनेही आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीसाठी वाहने न देण्याचा निर्णय घेतला होता. साखर निर्यातीचे करार केल्यामुळे साखर निर्यात करणे बंधनकारक होते. मात्र आंदोलकांनी ३८०/- रूपये हप्ता घेतल्याशिवाय वाहतुक होवू देणार नाही. असे ठरवल्याने आंदोलन चिघळत गेले. तसेच २८ व २९ सप्टेंबर २००७ रोजी जवाहर सहकारी साखर कारखाना येथे झालेल्या सर्वसाधारण वार्षिक सभेच्या पार्श्वभूमीवर २००६-०७ च्या गळीत हंगामात गेलेल्या ऊसाचा दर ३८०/- रूपयेच्या मागणीप्रश्नी शेतकऱ्यांत जनजागरण करण्यासाठी मोटार सायकल रॅली काढली. तसेच दत्त सहकारी साखर कारखान्यावरही २८ व २९ सप्टेंबर २००७ रोजी रॅली काढण्यात आली. आणि ऊस दरासाठी झालेल्या कराराप्रमाणे ३८०/- रूपयेचा हप्ता लवकर मिळावा म्हणून शेतकरी आंदोलकांनी हातकणंगले तालुक्यात कबनूर, माणगांव, रूई, रूकडी, रांगोळी, हुपरी, कुंभोज, नेज तसेच शिरोळ तालुक्यातील कुरूंदवाड, अब्दुललाट, शिरोळ, जयसिंगपूर, कोथळी या गावांतील व्यवहार बंद ठेवले.[३९] यानंतर आंदोलकांनी कुडीत्रे येथील कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याने गत हंगामात ऊसास प्रतिटन ३८०/- रूपये हप्ता त्वरीत द्यावा. अन्यथा कारखाना कार्यस्थळावर १० ऑक्टोबर २००७ पासून बेमुदत उपोषणास बसण्याचे ठरवून तसे निवेदन दिले होते.[४०] दक्षिण महाराष्ट्रातील आंदोलकांनी या प्रकारे दुसऱ्या टप्प्यात संघर्ष केल्याचे दिसून येते. मात्र या ऊस आंदोलनात शेतकऱ्यांचा सहभाग व लढ्याचे नेतृत्व खूप महत्वाचे होते.

**ऊस आंदोलनातील शेतकऱ्यांचा सहभाग व नेतृत्व :**

दक्षिण महाराष्ट्रातील आंदोलनात शेतकऱ्यांचा सहभाग लक्षणीय होता. १९ एप्रिल २००७ रोजी केलेल्या निर्धार यात्रेच्या पहिल्या दिवशी दहा हजार शेतकऱ्यांचा सहभाग होता. या शेतकऱ्यांच्या सहभागामुळे आंदोलनाची ताकद वाढ होती. आंदोलक निर्धार यात्रेच्या प्रवासावेळी गांवागांवातून जात असताना प्रचंड प्रमाणात शेतकरी या लढ्यात सहभागी होत होते. वाढत्या सहभागामध्ये फक्त शेतकरीच सामील होत होते

असे नाही तर, त्यांच्या बरोबर महिला, तरूण व लहान मुले, वयोवृद्ध शेतकरी सामील झाले. तसेच अपंग व दृष्टी नसणारे शेतकरी काठीचा आधार घेवून सहभागी झाले होते. आणि निर्धार यात्रेच्या शेवटच्या दिवशी कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक लाखाच्या आसपास शेतकऱ्यांचा सहभाग होता. तसेच आंदोलन करताना काढलेल्या रॅलीतही प्रचंड संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. दत्त सहकारी साखर कारखाना व जवाहर सहकारी साखर कारखान्यांवर काढलेल्या मोर्चात हजारो शेतकऱ्यांचा सहभाग दिसून आला. ३८०/- रूपयेचा हप्ता लवकर मिळावा म्हणून अनेक गांवामध्ये बंद पाळण्यात आले. या प्रकारे शेतकऱ्यांचा सहभाग ऊस आंदोलनात होता.

आंदोलनामध्ये नेतृत्वास महत्त्वाचे स्थान असते. कारण आंदोलनाचे यशापयश हे नेतृत्वावर आधारित असते. दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व आमदार राजू शेट्टी यांनी केले. शेतकऱ्यांच्या प्रत्येक आंदोलनात ते स्वतः अग्रस्थानी होती. ऊसदरासाठी काढलेल्या निर्धार यात्रेत प्रत्येक दिवशी ते स्वतः पायी चालत होते. लढ्याचे नेतृत्व करताना शेतकऱ्यांना त्यांनी आंदोलनाची माहिती, सूचना, आंदोलन टप्प्या-टप्प्याने कसे करायचे याबद्दल माहिती दिली होती. नेतृत्व करत असताना त्यांनी स्वतःवर झालेले घाव सोसले होते. या प्रकारे त्यांनी ऊस आंदोलन केले व याप्रकारे त्यांनी आंदोलन यशस्वी करण्याचे नेतृत्व त्यांनी केले.

**शेतकरी संघटनेने शासनासमोर मांडलेल्या मागण्या :**

दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलकांनी आपल्या मागण्या शासनासमोर मांडल्या आहेत. तसेच आमदार महादेवराव महाडिक यांनी ही श्री. छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखाण्याच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मागण्या मांडल्या त्या पुढील प्रमाणे आहेत.

१) केंद्र शासनाच्या धोरणामुळे साखरेचे भाव धरल्याने ऊस उत्पादकांना प्रतिटन ३००/- रूपये अनुदान देण्यात यावे.

२) जीवनावश्यक वस्तू कायद्याखाली साखरेचे किफायतशीर दर बांधून द्यावेत.

३) साखरेच्या मूल्यांकनावर बँकाकडून मिळणारी रक्कम आणि किमान वैधानिक किंमत यातील फरकाची रक्कम केंद्र सरकारने उपलब्ध करून द्यावी.

४) शासनाने ठरवून दिलेली किमान वैधानिक किंमत न देणाऱ्या साखर कारखान्यांवर करावाई करावी.

इत्यादी मागण्या मांडल्या होत्या. त्याचप्रमाणे साखर उद्योगाच्याही मागण्या मांडण्यात आल्या त्या पुढील प्रमाणे आहेत.

१) साखर उद्योगास प्राधान्य विभागाचा दर्जा देण्यात यावा.

२) शासनाने साखर कारखान्यांना ४ ते ६% व्याजदराने कर्जपुरवठा करावा.

३) मोलॅसिस वरील ७५० रूपये प्रतिटन एक्साईज ड्यूटी कमी करावी.

४) बगॅस आधारित वीज निर्मिती प्रकल्प उभारणीस अनुदान द्यावे.[४१]

इत्यादी सर्व मागण्या शासनाकडे मांडल्या होत्या.

**ऊस आंदोलनानंतर शासनाचे धोरण :**

दक्षिण महाराष्ट्रातील ऊस आंदोलनात शासनासमोर मांडलेल्या मागण्यांना काही प्रमाणात शासनाकडून प्रतिसाद मिळाला होता. तो पुढील प्रमाणे, १) तत्कालिन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आंदोलनानंतर आश्वासन दिले की, ऊसाचा दुसरा हप्ता देण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी जून २००७ च्या पहिल्या आठवड्यात बैठक घेतली जाईल.[४२] २) कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी ३८०/- रूपये देणे ही सरकारची जबाबदारी नाही. तो साखर कारखानदार व ऊस उत्पादक शेतकऱ्यांतील करार आहे. असे सांगून जबाबदारी झटकून टाकली. ३) महाराष्ट्राचे तत्कालिन सहकारमंत्री पतंगराव कदम म्हणाले की, "ऊस दराचे दुसरे हप्ते देणे हा प्रश्न दक्षिण महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे.[४३] ४) २००६-०७ च्या गळीत हंगामासाठी केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठा मंत्रालयाने ऊसाची किमान वैधानिक किंमत ९% उताऱ्यासाठी ८०२.५०/- रूपये एवढी ठरवली.

५) नंतर शासनाने असे धोरण स्पष्ट केले की, किमान वैधानिक किंमत साखर कारखान्यांनी देणे बंधनकारक आहे. वरील वेगवेगळ्या शासनाच्या संदिग्ध धोरणांमुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन चिघळत गेले. अशा प्रकारचे शासनाचे ऊस दराबाबतचे धोरण राहिल्याचे दिसून येते.

**ऊस आंदोलनाचा शेतकऱ्यांवर झालेला परिणाम :**

दक्षिण महाराष्ट्रातील आंदोलनामुळे शासनाने घेतलेल्या निर्णयाचे परिणाम ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर झालेले आहेत. ते पुढीलप्रमाणे ऊसाच्या २००६-०७ च्या गळीत हंगामातील दुसऱ्या हप्त्याचे ३८०/- रूपये अद्याप साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना दिलेले नाहीत. तसेच केंद्रीय कृषी खात्याच्या अकार्यक्षमतेमुळे सन २००६-०७ सालात साखरेची निर्यात होवू न शकल्यामुळे साखरेचा अतिरिक्त साठा होवून दर कोसळला. दर कोसळल्यानंतर साखर निर्यातीचे धोरण राबवले तरिही शेतकरी संघटनांनी केलेल्या आंदोलनामुळे पहिला हप्ता ९००/- रूपये दिला. यापूर्वी ही रक्कम ५६०/- ते ७००/- रूपये मिळत होता. मात्र दुसरा हप्ता मिळण्याची आशा मावळली आहे.[४४] असे म्हणावे लागेल. मात्र दक्षिण महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांनी ५०/- ते १२५/- रूपये पर्यंत दुसरा हप्ता दिला होता. मात्र शासनाने ठरवून दिलेली किमान वैधानिक किंमत शेतकऱ्यांना मिळाली नाही. त्यामूळे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. तरीही असे म्हणता येईल कि, शेतकरी संघटनांच्या आंदोलनामुळे तीन-चार वर्षात ऊसाला बऱ्यापैकी भाव मिळू लागला आहे. काही साखर कारखान्यांनी ऊस दराचे दुसरे हप्ते ५० ते १२५ रूपये दिले आहेत.[४५] यावरून असे दिसून येते कि, आंदोलनानंतरही काही प्रमाणात शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. दक्षिण महाराष्ट्रातील काही साखर कारखाने वगळता संपूर्ण महाराष्ट्रातील साखर कारखानदारांनी ऊसाचा योग्य दर दिलेला नाही.

# संदर्भ सूची


१) प्रा. डॉ. मुडेकर तेजस्विनी, 'शेतमालाच्या किंमती : प्रश्न, व्यवस्था, पर्याय', प्रबोधन प्रकाशन ज्योजी, भारती मुद्रणालय, कोल्हापूर, सप्टेंबर २००८, पृष्ठ क्र. ४३.

२) प्रा. डॉ. जाधव सुभाष, 'भारतीय शेतीतील संकट आणि शेतकरी शेतमजूरांची दुर्दशा', महाराष्ट्र राज्य किसान सभा, १६ नोव्हेंबर २००३, कोल्हापूर, पृष्ठ क्र. २३.

३) जोशी शरद, 'साखरेचे अर्थकारण व राजकारण', योजना, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, एप्रिल २००८, पृष्ठ क्र. ६.

४) प्रा. डॉ. पाटील जे. एफ. यादव संतोष, 'केंद्रीय अर्थसंकल्प व भारतीय शेती' प्रबोध प्रकाशन ज्योती, भारती मुद्रणालय, कोल्हापूर, मार्च २००७, पृष्ठ क्र. १३.

५) प्रा. डॉ. पाटील जे. एफ., डॉ. ककडे व्ही. बी., 'सामाजिक न्यायाचा तोंडवळा असणारा अर्थसंकल्प', प्रबोधन प्रकाशन ज्योती, मार्च २००७, भारती मुद्रणालय, कोल्हापूर, पृष्ठ क्र. १०.

६) डॉ. कांबळे पी. एस., 'ग्रामिण विकास गतिमान करणारे व सामाजिक विकासास प्राधान्य देणारे केंद्रीय अर्थसंकल्प', २००७-०८, प्रबोधन प्रकाशन ज्योती, पृष्ठ क्र. २०.

७) दैनिक लोकमत, ०१-०३-२००८, कोल्हापूर आवृत्ती, पृष्ठ क्र. ११.

८) प्रा. डॉ. जाधव सुभाष, 'भारतीय शेतीतील संकट आणि शेतकरी शेतमजुरांची दुर्दशा', महाराष्ट्र राज्य किसान सभा, १६ नोव्हेंबर २००३, कोल्हापूर, पृष्ठ क्र. ३६.

९) उपरोक्त, पृष्ठ क्र. ३९.

१०) उपरोक्त, पृष्ठ क्र. ४१.

११) उपरोक्त, पृष्ठ क्र. ६३.

१२) कोल्हापूर जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन २००६-०७, भाग-२, पृष्ठ क्र. १.

१३) उपरोक्त, पृष्ठ क्र. १३.

१४) उपरोक्त, पृष्ठ क्र. ४९.

१५) प्रादेशिक साखर सहसंचालक, कोल्हापूर विभाग, रेकॉर्ड.

१६) सांगली जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन २००६-०७, भाग-२, पृष्ठ क्र. १.

१७) उपरोक्त, पृष्ठ क्र. १२.

१८) उपरोक्त, पृष्ठ क्र. ३६.

१९) प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, रेकॉर्ड.

२०) डॉ. जुगळे वसंतराव, 'ऊसाच्या किंमतीचा घोळ', प्रबोधन प्रकाशन समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, पृष्ठ. क्र. ४४.

२१) उपरोक्त — पृष्ठ क्र. ४८.

२२) उपरोक्त — पृष्ठ क्र. ४५, ४६.

२३) उपरोक्त — पृष्ठ क्र. ४७.

२४) उपरोक्त — पृष्ठ क्र. ५३.

२५) प्रा. डॉ. जाधव सुभाष, 'भारतीय शेतीतील संकट आणि शेतकरी, शेतमुजरांची दुर्दशा', महाराष्ट्र राज्य किसान सभा, १६ नोव्हेंबर २००३, कोल्हापूर, पृष्ठ क्र. ६४.

२६) उपरोक्त, पृष्ठ क्र. ६५.

२७) उपरोक्त, पृष्ठ क्र. ६६.

२८) उपरोक्त, पृष्ठ क्र. ६६.

२९) 'स्वाभिमानी विचार' पाक्षिक, संपादक – आ. शेट्टी राजू, १ मे २००७, पृष्ठ क्र. ३.

३०) उपरोक्त, पृष्ठ क्र. ४.

३१) उपरोक्त, पृष्ठ क्र. ५.

३२) उपरोक्त, पृष्ठ क्र. ५.

३३) उपरोक्त, पृष्ठ क्र. ५.

३४) उपरोक्त, पृष्ठ क्र. ७.

३५) 'स्वाभिमानी विचार', पाक्षिक, १५ मे २००७, पृष्ठ क्र. १२.

३६) 'स्वाभिमानी विचार', पाक्षिक, १ मे २००७, पृष्ठ क्र. ४.

३७) 'स्वाभिमानी विचार', पाक्षिक, १५ मे २००७, पृष्ठ क्र. १३.

३८) दैनिक पुढारी, ८ डिसेंबर २००७, कोल्हापूर आवृत्ती, पृष्ठ क्र. १, २.

३९) दैनिक लोकसत्ता, लोकसत्ता वृत्तांत, २८ सप्टेंबर २००७, पृष्ठ क्र. १.

४०) दैनिक लोकमत, ५ ऑक्टोबर २००७, पृष्ठ क्र. ९.

४१) दैनिक पुढारी, ८ डिसेंबर २००७, पृष्ठ क्र. १.

४२) दैनिक पुढारी, १ मे २००७, पृष्ठ क्र. १.

४३) दैनिक पुढारी, आपलं कोल्हापूर, ३ मे २००७, पृष्ठ क्र. १.

४४) दैनिक पुढारी, आपलं कोल्हापूर, ५ जुलै २००७, पृष्ठ क्र. ४.

४५) दैनिक पुढारी, २९ जून २००७, पृष्ठ क्र. ७.